आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा, डिझेलसाठी दररोज ३० लिटर राखीव कोट्याला मंजुरी

आ. मुनगंटीवार यांच्या पत्रानंतर जिल्हाधिकाऱ्यांचे जिल्ह्यातील पेट्रोल पंपांना स्पष्ट निर्देश

खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना मोठा आधार; काळाबाजार रोखत थेट शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय

चंद्रपूर, दि. २८ : खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांना डिझेल टंचाईचा सामना करावा लागू नये, शेतीची कामे वेळेत पूर्ण व्हावीत आणि कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र राखीव डिझेल कोटा निश्चित करण्याची मागणी केली होती. शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ ऐकून न घेता त्या प्रत्यक्ष प्रशासनापर्यंत पोहोचवत त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्याची भूमिका आ. मुनगंटीवार यांनी घेतली होती. त्यांच्या या मागणीची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालकांना शेतकऱ्यांना ओळखपत्राच्या आधारे दररोज ३० लिटर डिझेल उपलब्ध करून देण्याचे निर्देश जारी केले आहेत.

सध्या खरीप हंगामाची लगबग सुरू असून शेतकऱ्यांना नांगरणी, पेरणी, मशागत आणि इतर शेतीच्या कामांसाठी मोठ्या प्रमाणात डिझेलची आवश्यकता भासत आहे. अनेक ठिकाणी डिझेलची कृत्रिम टंचाई निर्माण होणे, साठेबाजी किंवा अधिक दराने विक्री होण्याच्या तक्रारी आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे येत होत्या. ही परिस्थिती लक्षात घेत आ. मुनगंटीवार यांनी तातडीने हस्तक्षेप करत

शेतकऱ्यांना प्राधान्याने डिझेल उपलब्ध करून देण्याची मागणी प्रशासनाकडे केली होती. त्यानंतर जिल्हा प्रशासनाने तातडीने पावले उचलत पेट्रोल पंपांना स्पष्ट निर्देश जारी केले आहेत.

या आदेशानुसार शेतकऱ्यांनी आपले ओळखपत्र, सातबारा, फार्मर आयडी, वाहनाचा आरसी बुक अथवा आवश्यक कागदपत्रे दाखविल्यानंतर त्यांना दररोज ३० लिटरपर्यंत डिझेल देण्यात येणार आहे. तसेच पेट्रोल पंपांवर उपलब्ध साठा, दररोज होणारी विक्री आणि प्राप्त होणारा नवीन साठा याची माहिती दर्शनी भागात प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. काळाबाजार, साठेबाजी आणि कृत्रिम टंचाई रोखण्यासाठी प्रशासनाकडून नियमित तपासणी करण्यात येणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत प्रशासनाला संवेदनशील निर्णय घेण्यास भाग पाडणारे नेतृत्व म्हणून आ. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे पाहिले जाते. “शेतकरी अडचणीत असताना शासनाने आणि लोकप्रतिनिधींनी त्यांच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी लोकसेवा,” ही भूमिका त्यांनी नेहमीच जपली आहे. या निर्णयामुळे खरीप हंगामाच्या तोंडावर जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून ग्रामीण भागातून समाधान व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 3543/मे/२०२६ दिनांक : १६/०५/२०२६

प्रति,

**मा.जिल्हाधिकारी**
**चंद्रपूर**

**वंदे मातरम् !**

**विषय** : शेतकऱ्यांना शेती कामासाठी डिझेल कॅनमध्ये उपलब्ध करून देणे व शेतकऱ्यांकरीता डिझेलचा राखीव कोटा उपलब्ध ठेवण्याबाबत

**महोदय,**

सध्या खरीप हंगामाची पूर्वतयारी तसेच विविध शेतीकामे सुरू असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, पाण्याचे पंप, जनरेटर, थ्रेशर व इतर कृषी यंत्रसामग्री चालविण्यासाठी मोठ्या प्रमाणात डिझेलची आवश्यकता भासत आहे. अनेक शेतकऱ्यांची शेती ही गावापासून दूर, जंगल परिसरात अथवा दुर्गम भागात असल्यामुळे प्रत्येक वेळी ट्रॅक्टर किंवा कृषी अवजारे पेट्रोल पंपावर नेणे शक्य होत नाही. त्यामुळे शेतकरी डिझेल कॅनमध्ये घेऊन जाऊन शेतीची कामे करीत असतात. मात्र, सध्या अनेक पेट्रोल पंप चालकांकडून विविध कारणे सांगून शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल देण्यास नकार दिला जात आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक व मानसिक अडचणींचा सामना करावा लागत असून वेळेवर नांगरणी, पेरणी, सिंचन व इतर शेतीची कामे पूर्ण होत नाहीत. परिणामी शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ग्रामीण भागातील अनेक लहान व मध्यम शेतकऱ्यांकडे सर्व यंत्रसामग्री पेट्रोल पंपापर्यंत नेण्याची सुविधा उपलब्ध नसते. तसेच अनेक ठिकाणी विजेचा अभाव असल्यामुळे डिझेल पंपाच्या सहाय्याने पिकांना पाणी द्यावे लागते. त्यामुळे शेतीसाठी डिझेलची सहज उपलब्धता ही अत्यंत आवश्यक बाब आहे. तसेच शेती हंगामामध्ये डिझेलची वाढती मागणी लक्षात घेता शेतकऱ्यांना वेळेवर डिझेल उपलब्ध व्हावे यासाठी प्रत्येक पेट्रोल पंपावर शेतकऱ्यांकरीता स्वतंत्र राखीव डिझेल कोटा उपलब्ध ठेवण्यात यावा, जेणेकरून शेतकऱ्यांना डिझेल टंचाईचा सामना करावा लागणार नाही व शेतीची कामे सुरळीतपणे पार पडतील.

# जिल्हाधिकारी चंद्रपुर यांचे कार्यालय(पुरवठा शाखा)

दालन क्र.१३ व १४, तळमजला प्रशासकीय भवन, चंद्रपूर ४४२४०१

Email ID :- dsochandrapur@gmail.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- ०७१७२-२५२२७२


क्रमांक कावि/पुवि/कक्ष-१३/अ.का.नियतन/२०२६/ दिनांक-२८ मे, २०२६

**वाचा:** १. पेट्रोलियम नियम, २००२
२.जिवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५

## आदेश

चंद्रपूर जिल्ह्यात HPCL, IOCL, BPCL, NYRA, JIO या कंपन्यांचा पेट्रोल, डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असुन त्याचा नियमित व सुरळीत पुरवठा सुरु आहे. परंतु समाज माध्यमावरील अफवांमुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होत असल्यामुळे पेट्रोल पंपावर अनावश्यक गर्दी होत आहे. सध्या खरीप हंगाम सुरु असल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी डिझेलची आवश्यकता मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सद्यस्थितीचा विचार करता पेट्रोल/ डिझेल विक्रीबाबत उपाययोजना करणे आवश्यक आहे.

करीता, याद्वारे मी, वसुमना पंत (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, चंद्रपूर खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

१. शेतकऱ्यांना त्यांचे ओळखपत्र, सातबारा, फार्मर आयडी, मोबाईल क्रमांक, गाडीचे RC Book तपासुन दर दिवशी जास्तीत जास्त ३० लिटर डिझेलचा पुरवठा करावा.
२. रुग्णवाहीका व इतर अत्यावश्यक सेवांशी संबंधीत वाहनांना प्राधान्याने इंधन पुरवठा करण्यात यावा.
३. पेट्रोल व डिझेल यांची साठेबाजी किंवा काळाबाजार होणार नाही तसेच अतिरीक्त दराने पेट्रोल व डिझेलची विक्री होणार नाही याची दक्षता सर्व यंत्रणांनी घ्यावी. तहसिलदार यांनी पथक स्थापन करुन आपले तालुक्यातील पेट्रोलपंपांची तपासणी करुन प्रत्येक आठवड्याला अहवाल सादर करावा.
४. प्रत्येक पेट्रोल पंपाने आपल्या पंपावर उपलब्ध असलेला शिल्लक साठा, त्या दिवशी प्राप्त साठा व मागणी केलेला साठा याची माहिती दर्शनी भागात फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.
५. नागरीकांनी गरजेपेक्षा जास्त इंधन भरुन साठा करु नये तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असा फलक दर्शनी भागात लावणे आवश्यक आहे.
६. पेट्रोलपंप परीसरात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यरत ठेवावी व तपासणी वेळी फुटेज उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.
७. विक्री करण्यात येणाऱ्या डिझेलची विक्री नोंद ठेवण्यात यावी. तसेच तपासणी पथकास नोंद रजिस्टर उपलब्ध करुन देण्यात यावे.
८. पेट्रोलपंपावर होणारी गर्दी आणि संभाव्य वाद टाळण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाने पंपाच्या परीसरात नियमित गस्त ठेवावी.

या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधीत पेट्रोल पंप चालक/मालक/व्यवस्थापक यांची राहील. शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या तक्रारी असल्यास खालील टोल फ्री नंबरवर संपर्क साधावा: ०७१७२-२५२२७२. सदर आदेश तात्काळ प्रभावाने ३० जुन, २०२६ पर्यंत लागू राहतील. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास जिवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ व पेट्रोलियम नियम, २००२ नुसार कारवाई करण्यात यईल.

स्वा/-
(वसुमना पंत)
जिल्हाधिकारी, चंद्रपूर

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

दिनांक :

जावक क्रमांक :

तरी संबंधित पुरवठा विभाग, महसूल प्रशासन व सर्व पेट्रोल पंप चालकांना योग्य त्या सूचना देऊन शेतकऱ्यांना आधार कार्ड, सातबारा किंवा इतर आवश्यक ओळखपत्रांच्या आधारे शेती उपयोगासाठी डिझेल कॅनमध्ये देण्याबाबत तातडीने आदेश द्यावेत, तसेच प्रत्येक पेट्रोल पंपावर शेतकऱ्यांसाठी डिझेलचा राखीव कोटा ठेवण्याबाबतही योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.

कार्यवाहीची रुपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

सविनय धन्यवाद.

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :
१) मा. जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर
२) श्री. बंडू गौरकार, सदस्य, कृषी मुल्य आयोग, महाराष्ट्र राज्य.
३) श्री. शुभम शिवशंकर आमने मु.पो.ता. वरोरा जि.चंद्रपूर